# नागपुर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपुर.

दिनांक 25/03/2020 (बुधवार)
(सकाळ)

---

## घरफोडी

पो.स्टे. कुही :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर मौजा कुही येथे दिनांक 23/02/2020 चे 23:45 वा. ते दिनांक 24/03/2020 चे 05:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– जयकिशन रामटेके, वय 32 वर्ष, रा. जी. पी. नगर जे एन रोड अजनी फाटयाजवळ कामठी, जि. नागपुर यांची आई मरण पावल्याने फिर्यादी हे कामठी येथे गेले होते. दरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या घराचा दाराचा कुलुप तोडुन घरात प्रवेश केला. तसेच आरोपीने कपाटामध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने 33,222/–रू. व नगदी 3,000/–रू. असा एकुण कि. 36,222/–रू. चा मुद्देमाल चोरी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक सुचिता मांडवले हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. कळमेश्वर :– अंतर्गत 16 कि. मी. अंतरावर मौजा तेलगाव येथे दिनांक 24/03/2020 चे 07.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुनिल देवराव कावळे, वय 40 वर्ष, रा. तेलगाव ता. कळमेश्वर व आरोपी 1) मारोती पडोळे व 2) वैभव पडोळे दोन्ही रा. तेलगाव ता. कळमेश्वर एकमेकाचे घरा शेजारी राहात असुन फिर्यादी घरी तोंड धुवत असतांना आरोपी क्र. 1. ने फिर्यादीच्या अंगनात केरकचरा फेकला. त्यामुळे फिर्यादीने हटकले, या कारणावरून आरोपी क्र. 2 ने फिर्यादीचे डोक्यावर काठीने मारहाण करून जखमी केले. आरोपीतांनी फिर्यादीस शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार काबंडी 9923123397 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर